admn15-16


# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

**आय्‌एस्‌ओ ९००१ : २००८ मानांकित संस्था**

**१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.**

MCAER कृषि परिषद

MCAER कृषि परिषद २००८-२००९

**ई-मेल : edn_mcaer@rediffmail.com** **दूरध्वनी (०२०) २५५३ ७६८८.**

**वेबसाईट : www.mcaer.org** **फॅक्स (०२०) २५५३ ३७६४.**


जा.क्रःमकृप/शिक्षण-१/२३१५/२५६१ दिनांक ८ सप्टेंबर,२०१५

## प रि प त्र क

**विषयः- राज्यस्तरीय गुणवत्ता यादीतील उमेदवारांना विना अनुदानित महाविद्यालयातील व्यवस्थापन कोटयाच्या रिक्त जागांवर प्रवेश देण्याबाबत.**

सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षामधील चारही कृषी विद्यापीठांतर्गत पदवी अभ्यासक्रमाच्या पहिल्या वर्षाची प्रवेश प्रक्रिया राबविण्यात आली. याअंतर्गत दि.१६/८/२०१५ ते २१/८/२०१५ या कालावधीमध्ये विना अनुदानित महाविद्यालयातील व्यवस्थापन कोटयातील जागांची संबंधित महाविद्यालयस्तरावर प्रवेश फेरी राबविण्यात आली. तथापि, सदर कोटयातील काही जागा रिक्त आहेत.

व्यवस्थापन कोटयातील रिक्त जागा विचारात घेता **दि. १० ते १२ सप्टेंबर,२०१५ या कालावधीत संबंधित महाविद्यालयस्तरावर प्रवेश प्रक्रिया** राबविण्याचे या परिपत्रकाद्वारे सूचित करण्यात येत आहे. **या प्रवेश फेरीद्वारे फक्त विद्यापीठ / राज्यस्तरीय गुणवत्ता यादीत समावेश असलेले उमेदवारच प्रवेशास पात्र असतील.**

ज्या कायमस्वरूपी विना अनुदानित तत्वावरील महाविद्यालयांना सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षामध्ये नव्याने मान्यता दिलेली आहे / तुकडीवाढ दिलेली आहे किंवा ज्या महाविद्यालयांचा चालू शैक्षणिक वर्षाच्या ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेमध्ये समावेश नाही, अशा महाविद्यालयांनीसुध्दा सदर परिपत्रकानुसार कार्यवाही करावी व प्रवेशाचा तपशील संबंधित कृषी विद्यापीठ आणि कृषी परिषद यांना **दि. १२ सप्टेंबर,२०१५ हया अखेरच्या दिवशी ई-मेलद्वारे सादर करावा.**

**मा.महासंचालक**
**यांच्या मान्यतेने.**

**स्वाक्षरीत/-**
**संचालक (शिक्षण)**

प्रति,

१. मा.मंत्री (कृषी) तथा अध्यक्ष, कृषी परिषद यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा. कुलगुरु / कुलसचिव / अधिष्ठाता (कृषी), महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी, जि.अहमदनगर / डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ,अकोला / वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी / डॉ.बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली जि.रत्नागिरी.
३. मे.कल्प टेक्नॉलॉजीज प्रा.लि., शॉप १ व २, राधाकांत को-ऑप हौसिंग सोसायटी, रामबाग कॉलनी, कृष्णा हॉस्पीटलसमोर, पौड रोड, पुणे ४११ ०३८.

२/- त्यांना सूचित करण्यात येते की, पदवी अभ्यासक्रमाच्या वरील प्रवेश कार्यपध्दतीविषयी सर्व कृषी विद्यापीठांतर्गत विना अनुदानित कृषी व संलग्न विषयाच्या महाविद्यालयांना तसेच राज्यस्तरीय प्रवेश गुणवत्ता यादीतील सर्व विद्यार्थ्यांना आणि इतर प्रवेशोच्छुक उमेदवारांना अवगत होण्याच्या दृष्टिकोनातून सदरचे परिपत्रक संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे. तसेच प्रत्येक महाविद्यालयाच्या 'लॉग इन'मध्ये योग्य त्या सुविधा उपलब्ध करून द्याव्यात **आणि तद्‌नुसार संबंधित सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य तसेच राज्यस्तरीय गुणवत्ता यादीतील सर्व उमेदवार यांना ई-मेल / 'एस्‌एम्‌एस्'द्वारे कळविण्यात यावे.**

४. मे. जे. डी. आय. एन. सॉफ्ट, ई-१४, वर्ल्ड ऑफ मदर कॉम्प्लेक्स, जय गणेश व्हिजन, आकुर्डी, पुणे ४११ ०३५.

२/- त्यांना सूचित करण्यात येते की, कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर सदर परिपत्रक प्रसिध्द करण्यात यावे.